## संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती

**पसंतीवर आधारित श्रेयांक पद्धती (CBCS) अभ्यासक्रम २०२२-२०२३**
**विभाग अ (Part-A)**
**विद्याशाखा : मानव विज्ञान (Faculty - Humanities)**
**अभ्यासक्रम : वाङ्.मय स्नातक / बी.ए., (Programme - B.A.)**
**विषय : मराठी वाङ्.मय (ऐच्छिक)**
**बी.ए.भाग-१, सत्र-२**

**प्रस्तावना :- (Preamble)**

मराठी साहित्याच्या विविध वाङ्मय प्रवाहाचा अभ्यासातून विद्यार्थ्यांच्या ज्ञानाच्या कक्षा रूंदावतील. विविध साहित्य प्रवाहातील अभ्यासातून साहित्य निर्मितीच्या घटकांचे तंत्र विद्यार्थ्यांच्या अंगी विकसित होतील. साहित्यातून मानवी मूल्यांचे आकलन विद्यार्थ्यांना होईल. वाचन, लेखन, श्रवण कौशल्य विकसित होतील तसेच उपयोजित संकल्पना अभिवृद्ध होतील. साहित्य विश्वातून नवनिर्मितीचा व सर्जनशीलतेचा नवा अविष्कार अभिवृद्ध होण्यासाठी विद्यार्थ्यांना मदत होईल. प्रबोधनाची विचारधारा विकसित होईल. संशोधनाची नवप्रेरणा निर्माण होईल. एकूणच सर्व विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाकरिता साहित्यातील प्रेरणा मार्गदर्शक ठरतील.

**मराठी वाङ्.मय (ऐच्छिक) अभ्यासक्रमाची विशिष्ट निष्पत्ती (PSOs) :**

१) संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या मानव विज्ञान विद्याशाखेतील मराठी वाङ्.मय (ऐच्छिक) अभ्यासक्रमाच्या अध्ययनामुळे विद्यार्थ्यांची साहित्य ही संकल्पना स्पष्ट होऊन मराठी भाषाविषयक अभिरुची विकसित होईल.
२) मराठी साहित्य परंपरा, लेखक, कवी, विचारवंत यांचा परिचय होईल, त्यांचा लेखनातून आलेल्या सामाजिक एकात्मता, सर्वधर्म समभाव, राष्ट्रीय एकात्मता आणि भारतीय राज्यघटनेचे अधिष्ठान असलेल्या मानवी मूल्यांची विद्यार्थ्यांमध्ये रुजवणूक होईल.
३) विद्यार्थ्यांमध्ये साहित्य व कला याविषयी आवड निर्माण होईल. त्याची चिकित्सा, तुलना, समीक्षा करण्याची दृष्टी विकसीत झाल्यामुळे विविध साहित्य प्रकारातील लेखनाचे योग्य अध्ययन, संशोधन आणि सर्जनशील निर्मिती करतील.
४) भाषा आणि साहित्याचा सामाजिक तसेच कलात्मक पातळीवर अभ्यास केल्याने विवेकपूर्ण तर्कसंगतता आणि कारुण्यपूर्ण संवेदनशीलता निर्माण होऊन साहित्याचे व्यावहारिक उपयोजन करता येईल.
५) साहित्याच्या विद्यार्थ्यांमध्ये मराठी साहित्याच्या अभ्यासासह प्रतिष्ठापूर्ण रोजगार मिळविण्यासाठी कौशल्ये प्राप्त होतील.
६) रोजगारा निर्मितीसाठी लागणाऱ्या विविध कौशल्य निर्मितीचा दृष्टिकोन विद्यार्थ्यांमध्ये निर्माण होईल.

**विभाग-ब**
**बी.ए. भाग-१, सत्र-२**
**विषय :मराठी वाङ्.मय (ऐच्छिक)**

**अभ्यासपत्रिकेची निष्पती (COs) :**

१) मानवी जीवन समृद्ध करणाऱ्या 'नाटक' या वाङ्.मयप्रकाराचा परिचय विद्यार्थ्यांना होईल.
२) 'वाटा पळवाटा' या नाटकातील विविध मानवी प्रवृत्तीचे दर्शन घडेल.
३) 'वाटा पळवाटा' नाटकांच्या माध्यमातून सामाजिक संस्कृतीचे दर्शन होईल तथा विविध व्यक्तिमत्त्वांचा परिचय होईल.
४) 'वाटा पळवाटा' च्या अभ्यासाने नाटकाचे आकलन, आस्वाद आणि मूल्यमापन करण्याची क्षमता विकसीत होईल.
५) नाटक निर्मितीच्या घटकांचा, तंत्राचा अभ्यास झाल्याने नाटक निर्मिती करण्याची प्रेरणा विद्यार्थ्यांना मिळेल.
६) नाटक / रंगभुमीवर कारकीर्द करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना ही अभ्यासपत्रिका उपयुक्त ठरेल.
७) 'काव्यसरिता' च्या माध्यमातून विविध प्रकारच्या रचनांचा अभ्यास करता येईल.
८) सामाजिक जाणिवा, राष्ट्रीय एकात्मता, प्रेमविषयक भावना, भावनिकता या विचारांची बांधिलकी निर्माण होईल.
९) काव्यांच्या विविध प्रवाहांचा परिचय होईल व त्यातून काव्यनिर्मितीची प्रेरणा विकसीत होईल.

| अ.क्र. | अभ्यासपत्रिकेचे घटक | नेमलेले तास | श्रेयांक |
|---|---|---|---|
| १ | नाटक - 'वाटा पळवाटा' -<br>लेखक दत्ता भगत, कॉन्टीनेन्टल प्रकाशन, पुणे ३० | ३० | |
| २ | कविता - 'काव्यसरिता' (संपादित)<br>संपादक - डॉ.गजानन जाधव, डॉ.गजानन मुंदे, | ३० | ०४ |

| | | | |
|---|---|---|---|
| | राघव पब्लिशर्स ॲन्ड डिस्ट्रीब्युटर्स, नागपूर ('काव्यसरिता' मधीलक्र मांक ११ ते २५ कविता अभ्यासक्रमात राहतील.) | | |
| ३ | कौशल्याधिष्ठीत घटक अभ्यासक्रम | १५ | |
| | | ७५ | **०४** |

## गुण विभागणी

एकूण गुण - १००
लेखी गुण - ८०
अंतर्गत मूल्यमापन - २०
वेळ - ३ तास

अ) नाटक - 'वाटा पळवाटा' - ४० गुण

ब) कविता - 'काव्यसरिता' - ४० गुण

**प्रश्ननिहाय गुण विभागणी :-**

प्रश्न १ - संदर्भासह स्पष्टीकरण - २०गुण

नाटक व कवितेवर प्रत्येकी ०५ गुणांचे दोन संदर्भ विचारले जातील.

प्रश्न २ - 'वाटा पळवाटा' नाटकावर ०१ दीर्घोत्तरी प्रश्न - १२ गुण

प्रश्न ३ - 'वाटा पळवाटा' नाटकावर ०१ लघुत्तरी प्रश्न - ०८ गुण

प्रश्न ४ - 'काव्यसरिता' वर ०१ दीर्घोत्तरी प्रश्न - १२ गुण

प्रश्न ५ - 'काव्यसरिता' वर ०१ लघुत्तरी प्रश्न - ०८ गुण

(वरिल प्रश्नांना अंतर्गत पर्याय राहतील.)

प्रश्न ६ - वस्तुनिष्ठ बहुपर्यायी १० प्रश्न - प्रत्येकी ०२ गुणांचे - २० गुण

(वस्तुनिष्ठ बहुपर्यायी प्रश्नांमध्ये कादंबरी व कवितेवर प्रत्येकी ०५ प्रश्न विचारले जातील.)

**कौशल्य विकासावर आधारित अंतर्गत मूल्यमापन :- - २० गुण**

- गुण विभागणी

१) गृहपाठ - १५ गुण

२) मौखिक परीक्षा - ०५ गुण

सूचना :- (१) गृहपाठासाठी आपल्या परिसरातील लोकगीतांचे संकलन करून त्याचे विशेष नोंदवा.

(२) आपल्याला येणाऱ्या अनुभवाच्या आधारे कविता लिहा.

(३) मौखिक परीक्षा ही गृहपाठावर आधारीत असेल.